**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५०/२०२०** | **दिनांक २३/०६/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १७/०६/२०२० ते २३/०६/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २४/०६/२०१९ सकाळी ८:३० पासून २८/०६/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१७/०६** | **१८/०६** | **१९/०६** | **२०/०६** | **२१/०६** | **२२/०६** | **२३/०६** | | **२४/०६** | **२५/०६** | **२६/०६** | **२७/०६** | **२८/०६** |
| ६६.४ | ०.० | ३१.२ | ०.० | ०.० | ७.० | - | **पाऊस (मिमी)** | ३५ | ३५ | २१ | ३५ | ४७ |
| ३१.२ | ३१.७ | ३१.० | ३२.२ | ३३.४ | ३३.० | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३१ | ३२ | ३२ | ३२ | ३३ |
| २२.० | २५.८ | २४.० | २५.६ | २५.४ | २४.८ | - | **किमान तापमान (अं.से)** | २५ | २५ | २५ | २५ | २५ |
| ६ | ४ | ८ | ६ | ६ | ४ | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ६ | ८ | ६ | ८ |
| ९० | ९५ | ९३ | ९० | ९० | ८७ | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९३ | ९३ | ९२ | ९३ | ९३ |
| ७० | ८६ | ७७ | ७५ | ७६ | ७० | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ८४ | ८० | ७८ | ७८ | ८० |
| ३.९ | ६.७ | ४.७ | ४.७ | ६.३ | ४.० | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ८ | ८ | ९ | ८ |
| ई.ऊ. | नै.द. | ई.ऊ. | ई. | ई.पू. | शांत | - | **वाऱ्याची दिशा** | द. | द. | द. | द. | द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| **१०४.६** | **३९०.४** | **५१९७.२** |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**
**दिनांक २४ ते २८ जून, २०२० दरम्यान बहुतांश ठिकाणी मध्यम पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • पुढील पाच ही दिवस मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असल्याने हळव्या भात जातींची रोपे २० ते २१ दिवसांची आणि निमगरव्या व गरव्या जातींची रोपे २७ ते ३० दिवसांची झाली असल्यास तसेच १२ ते १५ सें.मी. उंचीची आणि पाच ते सहा पाने फुटलेली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस एकरी ३५ कि.ग्रॅ. युरिया, १२५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ३४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस दिल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी करून द्यावी.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी. (हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी. (निमगरव्या व गरव्या जातींसाठी) अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• चार सूत्री पध्दतीने लागवड करताना चिखलणीच्या वेळेस एकरी २ टन गिरीपुष्पाचा पाला जमिनीत गाडावा. चार सूत्री पध्दतीने भात पुर्नलागवड करण्यासाठी सुधारित किंवा संकरीत जातींची रोपे वापरून चुडांची नियंत्रित लावणी (१५-२५ सें.मी.) करावी. नियंत्रित लावणी नंतर त्याच दिवशी प्रत्येक चार चुडाच्या चौकोनात २.७ ग्रॅम वजनाची एक युरिया डीएपी ब्रिकेट हाताने ७.५ ते १० सें.मी. खोल खोचावी.<br>• बांधावरील खेकड्यांच्या नियंत्रणासाठी पावसाळ्याच्या सुरुवातीला सलग २ ते ३ रात्री बांधावरील खेकडे बत्तीच्या उजेडात पकडून त्यांची संख्या कमी करावी आणि नंतर विषारी आमिषाचा वापर करून खेकड्यांचे नियंत्रण करावे. १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पाण्यात मिसळणारी ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळ्या तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बिळे उकरली जातील अशा बिळात परत आमिष वापरावे. विषारी आमिषाचा वापर सांघिकरीत्या व एकाच वेळी केल्यास खेकड्यांचे नियंत्रण करण्यास मदत होईल. (सूचना: सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाही). |
| **फणस** | **-** | • फणसाच्या पाच वर्षावरील प्रत्येक झाडाला २० कि.ग्रॅ. चांगले कुजलेले शेणखत, १ कि.ग्रॅ. युरिया, १.५ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट व ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा देण्यात यावी. वर दिलेली खताची मात्रा पाच वर्षापेक्षा कमी वयाच्या लागवडीस देताना पहिल्या वर्षी १/५ पट, दुसऱ्या वर्षी २/५ पट, तिसऱ्या वर्षी ३/५ पट आणि चौथ्या वर्षी ४/५ पट द्यावीत. |
| वांगी | **पुर्नलागवड** | • वांगी पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन चांगले कुजलेले शेणखत, ४३ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. |
| **मिरची** | **पुर्नलागवड** | • मिरची पिकाची रोपे लागवडीयोग्य झाली असल्यास पुर्नलागवड करावी. पुर्नलागवड करतेवेळी रोपे डायमिथोएट १ मि. ली. प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरीवरंब्यावर ६० x ६० से.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ८ टन चांगले कुजलेले शेणखत, ८६ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि |

| | | |
|---|---|---|
| | | ३३ किलो म्युरेट ऑफ पोटश खताची मात्रा द्यावी. |
| **भेंडी** | **लागवड** | • भेंडी पिकाची लागवड सरी पद्धतीने ६० x ६० सें.मी. अंतरावर करावी. लागवडीच्या वेळेस प्रती एकरी ६ टन चांगले कुजलेले शेणखत, २९ किलो युरिया, १२५ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३३ किलो म्युरेट ऑफ पोटाश खताची मात्रा द्यावी. |
| **वेलवर्गीय भाजीपाला** | **लागवड** | • निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या नारळ सुपारीच्या बागांची साफसफाई केलेल्या जागेमध्ये नारळ सुपारीची पुर्नलागवड करण्यासाठी अवधी लागणार असेल तर या कालावधीमध्ये काकडी, चिबूड, पडवळ, दोडका, कारली इ. वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी. लागवड आळे पद्धतीने १.५ x १.० मीटर करावी. लागवड करताना प्रत्येक आळ्याला २ किलो चांगले कुजलेले शेणखत व ५० ते ६० ग्रॅम मिश्रखत (सुफला) मातीत मिसळून देण्यात यावे.<br>• वाढीच्या अवस्थेत असलेल्या वेलवर्गीय भाजीपाला पिकांना काठीचा आधार दयावा किंवा मंडपाची व्यवस्था करावी. |
| **टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.** | | |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |